महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

पी.आर-३/सबसिडी/ No 12434 दिनांक : 09 MAY 2013

## वाणिज्य परिपत्रक क्र. १९८

**विषय :-** सन २०१२-१३ च्या रब्बी अंतिम हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात ३३.५% सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र. एससीवाय २०१२/प्र.क्र.४२८/म-७ दिनांक ०९/०१/२०१३.
२. वाणिज्य परिपत्रक क्र. १८९ दिनांक : १२/०३/२०१३.
३. शासन निर्णय क्र. एससीवाय २०१३/प्र.क्र.१७४/म-७ दिनांक १०/०४/२०१३.

संदर्भातील (१) च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने राज्यातील सन २०१२-१३ च्या खरीप हंगामात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर केलेली होती. त्या अनुषंगाने सदर शासन निर्णयात निर्देशित केल्याप्रमाणे ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांतील कृषी ग्राहकांना ३३.५ टक्के सवलत देण्याबाबतचे निर्देश वाणिज्य परिपत्रक क्र. १८९ दि.१२.३.२०१३ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेले आहेत.

शासनाने संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयाद्वारे सन २०१२-१३ च्या रब्बी हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गांवामध्ये टंचाई परिस्थिती जाहीर केलेली आहे. सदर शासन निर्णयात ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या रब्बी हंगामातील गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३.५ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने शासन आदेशात निर्देशित केल्याप्रमाणे सन २०१२-१३ च्या रब्बी हंगामातील टंचाईग्रस्त गावातील कृषी ग्राहकांना शासनाच्या धोरणानुसार प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५% सवलत देण्यात यावी.

जिल्हानिहाय रब्बी हंगामात अंतीम पीक पैसेवारीनुसार ५० पैसे वा त्यापेक्षा कमी असलेल्या गावांची संख्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

रब्बी हंगाम २०१२-१३ या वर्षाकरीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सदरच्या सवलतीच्या वीज दराची देयके वितरीत करण्यात यावीत.

शासनाच्या सवलतीच्या दराने चालू वीज देयकाचा भरणा न करणा-या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार / कायद्यानुसार खंडीत करण्याची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

डॉ-पि. स्वा. मु
मुख्य अभियंता (वाणिज्य)

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**प्रत सस्नेह रवाना :-**
मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात रब्बी हंगाम २०१२-१३ या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३.५ टक्के सवलत देण्यात यावी व दिलेल्या सवलतीपोटी वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोजाची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्तता: करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

सन २०१२-१३ च्या रब्बी अंतिम हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी, अंतिम पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०१३/ प्र.क्र. १७४ / म-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० एप्रिल, २०१३,

पहा:- १)शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१३/ प्र.क्र.४/म-७, दिनांक २१.१.२०१३

२) शासन शुद्धीपत्रक क्रमांक :- एससीवाय-२०१३/प्र.क्र.४/म-७, दिनांक २१.२.२०१३

**प्रस्तावना :**

सन २०१२ च्या पावसाळ्यात राज्यातील काही भागात अपुऱ्या पावसामुळे टंचाई सदृश्य परिस्थिती जाणवत होती. ही बाब लक्षात घेता शासनाने वरील संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील रब्बी हंगामाच्या हंगामी पैसेवारीच्या आधारे टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करुन पुढील सवलती जाहीर केल्या होत्या.

१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यकतेप्रमाणे कामे सुरु करणे व कोणतीही व्यक्ती रोजगारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घेणे.

२) पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांमध्ये टँकर्स, बैलगाड्या इत्यादी मार्फत पाणी पुरवठा करणे.

३) मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पामध्ये पिण्यासाठी पाणी अग्रहक्काने राखून ठेवणे.

४) ज्या गावांतील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी जाहीर करण्यात आली आहे, त्या तालुक्यांतील मंडळस्तरावर व आवश्यकतेनुसार गावस्तरावर जास्तीत जास्त एक चारा छावणी उघडावी.

५) परीक्षा शुल्कात माफी.

राज्यातील सर्व महसूली विभागातील रब्बी पिकांची अंतिम पैसेवारी दिनांक १५ मार्च, २०१३ रोजी जाहीर झाली असून या मध्ये एकूण २७९४ गावांमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आढळून आली आहे. त्यानुषंगाने योग्य त्या सवलती उपलब्ध करुन देण्याची बाब शासन विचाराधीन होती. या सर्व बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सन २०१२-१३ च्या रब्बी हंगामात पुणे, नाशिक, औरंगाबाद या महसूली विभागातील जिल्हाधिकाऱ्यांनी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषीत केलेल्या २७९४ गावांमध्ये (परिशिष्ट - अ ) टंचाई परिस्थिती जाहीर करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त नमूद केलेल्या गावांमध्ये शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०१३ मध्ये नमूद केलेल्या चार सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात याशिवाय या गांवाना खालीलप्रमाणे चार अतिरिक्त सवलती नव्याने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

i) जमीन महसूलात सूट
ii)सहकारी कर्जाचे रुपांतरण
iii)वीज बिलात ३३.५% इतकी सूट
iv)शेतीशी निगडीत कर्जाच्या सक्तीच्या वसुलीस स्थगिती

३. ज्या गावांची नजर अंदाज (हंगामी ) पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी होती, मात्र आता अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त झाली आहे, तेथे कोणतीही सवलत येथून पुढे लागू होणार नाही. तसेच जनावरांची छावणी चालू ठेवण्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

४. प्रस्तुत आदेशामधील रब्बी गावांची अंतिम पैसेवारी ५० पैसे व त्यापेक्षा कमी आलेली आहे, त्या गावांचे नावनिशीवार ५० पैसे व त्यापेक्षा कमी पीक पैसेवारी आल्याबाबत सोबतच्या प्रपत्र-ब मधील विहीत नमुन्यात जाहीर करावी तसेच या आदेशाला योग्य ती प्रसिद्धी द्यावी.

५. ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांतील स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनांची चालू वीज देयके ३३% ग्रामपंचायतीने भरण्याच्या अटीस अधीन राहून ६७% (१७% मदत व पुनर्वसन व ५०% पाणी पुरवठा विभागाच्या देखभाल खर्चातून ) भरण्यात येतील.

६. या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी संबंधित कार्यालयांना उपलब्ध करुन द्यावा.

७. या आदेशाच्या निर्गमनामुळे शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २२.८.२०१२ व दिनांक २४.८.२०१२ मधील आदेश निष्प्रभावी होतील.

८. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

९. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०४१०१४३६०२४९१९ असा आहे.

( प्रदीप प्रं. इंदुलकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- परिशिष्ट- अ आणि परिशिष्ट- ब

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
कार्यकारी अभियंता (सर्व) जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, मुंबई,
मुख्य अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा / नागरी पाणी पुरवठा,
प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / परभणी / परळी- वैजनाथ / बीड,
आयुक्त कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
महालेखापाल - इ,(लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
महालेखापाल -१/२,(लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर)
मुख्य व्यवस्थापक (पतपुरवठा ) बँक ऑफ महाराष्ट्र , १५०१, लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-५
मुख्य व्यवस्थापक (पत पुरवठा), बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, लोकमंगल, शिवाजीनगर , पुणे-५

महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय, ५४, वेलस्ली रोड, शिवाजी नगर, पुणे,

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, ग्रारोयो / जलसंधारण

सहकार व वस्त्रोद्योग विभाग (सहकार - कार्या -२स, ५ प्रती)

कृषि व पशुसंवर्धन , दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषी)

वित्त विभाग (व्यय-१)

पाटबंधारे विभाग (लाक्षेविप्रा)

नियोजन विभाग, रोहयो -६(५ प्रती)

ऊर्जा विभाग (ऊर्जा-४) (५ प्रती)

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापु-१४) (५ प्रती)

महासंचालक, माहिती व प्रसिद्धी संचालनालय, मंत्रालय, मुंबई - ३२

सर्व मंत्रालयीन विभाग,

कार्यासन अधिकारी, म-३/ म-११/ ल-२/ टि-२/ ब-१/ फ-४, महसूल व वन विभाग,

निवडनस्ती म-७ कार्यासन

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक :- एससीवाय -२०१३/ प्र.क्र.१७४/म-७
दिनांक :- १० एप्रिल, २०१३ चे परिशिष्ट -अ
सन २०१२-१३ सालातील रब्बी हंगामाच्या अंतिम पैसेवारीचा गोषवारा

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | एकूण रब्बी गावे | पैसेवारी जाहीर केलेली रब्बी गावे | ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेली रब्बी गावे | ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी असलेली रब्बी गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | पैसेवारी निरंक कोकणात रब्बी गावे नाहीत | | | | |
| २ | पुणे | पुणे | ४५३ | ४५२ | १८२ | २७० |
| | | सातारा | १९२ | १९२ | ९४ | ९८ |
| | | सांगली | १०४ | १०४ | १०४ | ० |
| | | सोलापूर | ११४४ | ११४४ | ११४४ | ० |
| | | कोल्हापूर | रब्बी गावे नाहीत. | | | |
| | विभागाची एकूण | | १८९३ | १८९२ | १५२४ | ३६८ |
| ३ | नागपूर | नागपूर विभागातील सर्व रब्बी गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा अधिक आहे. | | | | |
| ४ | अमरावती | अमरावती विभागात रब्बी गावे नाहीत. | | | | |
| ५ | नाशिक | अहमदनगर | १०१७ | १०१७ | ९७७ | ४० |
| | विभागाची एकूण | | १०१७ | १०१७ | ९७७ | ४० |
| ६ | औरंगाबाद | उस्मानाबाद | ३५६ | २९३ | २९३ | ० |
| | विभागाची एकूण | | ३५६ | २९३ | २९३ | ० |
| | एकूणात एकूण | | ३२६६ | ३२०२ | २७९४ | ४०८ |

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक :- एससीवाय-२०१३/ प्र.क्र.१७४/म-७
दिनांक :- १० एप्रिल, २०१३ चे सहपत्र
परिशिष्ट - ब

ज्या अर्थी, शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक :- एससीवाय-२०१३/ प्र.क्र.१७४/ म-७, दिनांक १० एप्रिल, २०१३ नुसार सन २०१२-१३ च्या रब्बी हंगामातील ज्या गावांची अंतिम पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी आलेली आहे ती गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करावयाची आहेत.

त्या अर्थी, अत्यानुषंगाने मी जिल्हाधिकारी, जिल्हा खाली नमूद केलेल्या तालुक्यांमध्ये त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या गावांत टंचाई परिस्थिती जाहीर करीत आहे :-

| अ.क्र. | तालुका | रब्बी पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैसे वा त्यापेक्षा कमी आलेल्या गावांची नावे व संख्या |
|---|---|---|
| | | |
| | | |

सही
जिल्हाधिकारी, जिल्हा